महा मेट्रो

PUNE METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

महा मेट्रो : फिडर सर्विस सक्षम बनविण्याच्या दिशेने प्रयत्न

"जास्तीत जास्ती मिळणार कनेक्टिव्हिटी"

**"पुणे मेट्रो रेल प्रकल्प ....करतोय शहराचे सकारात्मक परिवर्तन"**

पुणे २६ : कुठल्याही शहराला स्मार्ट शहर बनविण्याकरिता संरचनात्मक पायाभूत सुविधांची अंमलबजावणी करणे अत्यंत गरजेचे असते. महा मेट्रो शहराच्या वाहतूक सुविधा बळकट करण्यासाठी अत्यंत महत्वाची आहे. महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचे निर्माण कार्य वेगाने सुरु आहे. महा मेट्रोने शहरी वाहतूकीत आमुलाग्र बदल होणार आहेत. मेट्रो मार्गावर तर नागरिकांना फिडर सर्विसच्या योजना करण्यात येणार आहे ज्याद्वारे जास्तीत जास्ती लोकांना मेट्रो सेवेचा लाभ घेता येईल.याच अनुषंगाने फिडर सर्विससाठी पीएमपीएल बस सेवेशी जोडण्यात येईल. व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीक्षित यांच्यानुसार जास्तीत जास्ती नागरिकांना मेट्रोशी जोडणे आवश्यक आहे. रेल्वे स्टेशन,एयरपोर्ट, बस स्थानक,व्यवसायिक क्षेत्र,तसेच जास्तीत जास्ती नवीन आणि जुन्या वस्तीना बस सेवा, ई-रिक्षा,आटो,टॅक्सी व मो-बाईकच्या माध्यमातून मेट्रोचे प्रवासी सहज जवळील मेट्रो स्टेशन पर्यंत ये-जा करू शकतील.

महा मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या निर्माण कार्याने शहराचे रूप बदलत चालले आहे,तर दुसऱ्या बाजूने सार्वजनिक परिवहनची, एक गौरवपूर्ण सेवा शहरातील नागरिकांना उपलब्ध होत आहे. याच दिशेने भविष्यात टीओडी (ट्राजिंट ओरिएटेड पॉलिसी) सुद्धा अमलात आणली जाईल, यामध्ये ५०० मीटरच्या कॉरिडोअर मध्ये व्यावसायिक उपक्रमाला

विकसित करण्याचे नियोजित करण्यात येईल. फिडर सर्विस ची जी रूपरेषा निर्धारित करण्यात आली आहे, ती निश्चितच मेट्रो मध्ये प्रवास करणाऱ्या यात्रेकरू करिता सुलभ आणि कमी खर्चाचे ठरणार. मेट्रो सेवा आणि फिडर सर्विसच्या माध्यमातून वाढत्या प्रदूषणवर आळा बसेल व प्रचंड गर्दी असलेल्या रस्त्यावरचा भार कमी होण्यास मदत मिळेल.

याशिवाय शक्य असेल त्याठिकाणी जसे की; शिवाजी नगर, पुणे रेल्वे स्टेशन, सिव्हील कोर्ट,स्वारगेट येथे मल्टी मॉडेल हब तैयार करण्याचा महा मेट्रोने ठरविले आहे जेणेकरून नागरिकांना एकाच ठिकाणाहून बस,रेल्वे,पीएमपीएल बस वाहतूक सेवा मिळू शकेल व सर्व सोयी सुविधायुक्त ठरेल.

याशिवाय सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करण्याच्या उद्देशाने कार्य करत असतानाच ती प्रवाश्यांसाठी सोपी, सोयीस्कर आणि उपयुक्त ठरेल यासाठी महा मेट्रो पुणे सुरवातीपासूनच प्रयत्नशील आहे. नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा वापर सोप्या व सहज पद्धतीने करता यावा यासाठी स्मार्ट कार्ड चलनात असणे गरजेचे आहे. यासाठी महामेट्रो पुणे द्वारे पुढाकार घेत “कॉमन मोबिलिटी कार्ड” ची सेवा नागरिकांना उपल्बध करून देणार आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरण्यास नागरिकांना प्रोत्साहित करण्याकरता महा मेट्रो, रेल्वेआणि पीएमपीएलचे या कार्ड द्वारे एकत्रिकरण केले जाईल.

कॉमन मोबिलिटी कार्ड म्हणजेच ही एक अभिनव संकल्पना आहे. नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड स्पेसिफिकेशनच्या आधारावर हे कार्डयेईल याद्वारे कुठेही न थांबता प्रवास करता येणार आहे. घरापासून ते मेट्रो स्टेशन आणि परत मेट्रो स्टेशन ते ऑफिस पर्यंत उपयोगात येणाऱ्या सर्व सार्वजनिक वाहतुकीसाठी या कार्डचा वापर होईल. जसे ऑटो, मोबाइक, बस आणि मेट्रो याठिकाणी कार्ड स्वाईप करून प्रवासी दर चुकवता येईल. यासाठी प्रत्येकवेळी तिकीट विंडोवर उभे राहण्याची गरज नाही.